www.rajdand.com
सातारा, बुधवार
08.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ शु.११
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

अदानींसाठी मंगळवार ठरला 'मंगलदिन'; सर्वाधिक श्रीमंतांच्या यादीत पुन्हा झेप

पान ४ वर..

'तुझ्या ऊसाला लागल कोल्हा..' या मराठी गीताची आठवण करून देणारे हे निळ्याशार आकाशापुढील बहरलेल्या ऊस पीक शेतीचे दृश्य. मात्र, सध्या काढणीला आलेल्या या उसाला भलेमोठे तुरे आल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत असून या तुऱ्यांमुळे गाळप वजनामध्ये उसाला घट निर्माण होऊन शेतकऱ्यांचा मात्र तोटा होतो. मात्र संपूर्ण हिरव्यागार गालीच्यावर दिसणारे हे मऊ केसाळ तुरे पाहणाऱ्याला मात्र मनमोहक वाटतात, हे मात्र नक्की! (छाया : अतुल देशपांडे, सातारा)

बाळासाहेब थोरात यांचा पक्षनेते पदाचा राजीनामा

...अखेर काँग्रेसमधील अंतर्गत खदखद चव्हाट्यावर

मुंबई : प्रतिनिधी

प्रदेश काँग्रेसमध्ये गेल्या काही काळापासून सुरू असलेली खदखद आणि दुफळी आता चव्हाट्यावर आली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेते पदाचा राजीनामा दिला आहे.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या विरोधात पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीचे वारे वाहू लागले होते. विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघात त झालेल्या निवडणुकीत सत्यजित तांबे यांना उमेदवारी देण्यावरून या नाराजीला तोंड फुटले. पक्षाने तिकीट नाकारल्यावर तांबे यांनी अपक्ष निवडणूक लढवून विजय प्राप्त केला.

निवडणूक पार पडतात तांबे यांनी पत्रकार परिषद घेऊन नाना पटोले आणि प्रदेश पातळीवरील नेतृत्वावर गंभीर आरोप केले. आपल्या कुटुंबाला पक्षातून हद्दपार करण्यासाठी आणि आपले मामा बाळासाहेब थोरात यांच्यावर शिंतोडे उडवण्यासाठी पटोले यांनी नियोजनबद्ध कारस्थाने केल्याचा आरोप त्यांनी केला.

खुद्द थोरात यांनी पटोले यांच्या विरोधात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे लेखी तक्रार नुकतीच दिली आहे. पक्षातील कोणताही महत्त्वाचा निर्णय घेताना पाठवले आपल्याला विश्वासात घेत नाहीत. त्यामुळे यापुढील काळात पटोले यांच्याबरोबर काम करणे अशक्य आहे, असे थोरात यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे.

या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पक्षश्रेष्ठी बाळासाहेब थोरात यांच्यावर कारवाई करणार की प्रदेशाध्यक्ष पटोले यांना समज देणार हे गुलदस्त्यात असताना आता थोरात यांनी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला आहे.

चिंचवडलाही मविआत बंडखोरीची चिन्ह; राहुल कलाटे अपक्ष निवडणूक लढविणार

पिंपरी : प्रतिनिधी

पुण्यापाठोपाठ चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतही महाविकास आघाडीला बंडखोरीला सामोरे जावे लागण्याची चिन्ह आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे राहुल कलाटे यांनी ही निवडणूक अपक्ष लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

आघाडीमध्ये झालेल्या समझोत्यानुसार चिंचवडचा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसने नाना काटे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, या निर्णयावर नाराज असलेले कलाटे अपक्ष निवडणूक लढविणार आहेत.

काही दिवसांपूर्वी, कलाटे यांनाच उमेदवारी दिली जाईल. मात्र, ते राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवतील, अशी चर्चा होती. त्यानुसार कलाटे यांनी तयारीही सुरू केली. मात्र ऐन वेळी उमेदवारीची माळ काटे यांच्या गळ्यात पडली.

मागील विधानसभा निवडणुकीत कलाटे यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढवून लक्ष्मण जगताप यांच्यासमोर तगडे आव्हान उभे केले होते.

...तर तुमच्यावर येईल सतरंज्या उचलण्याची वेळ

इम्तियाज जलील व राजेश टोपे यांच्यात रंगला कलगीतुरा

औरंगाबाद : प्रतिनिधी

आमच्या मतांवर तुम्ही वर जाऊन बसायचे आणि आम्ही सतरंज्या उचलायच्या ही वेळ आता गेली. आता कदाचित तुमच्यावरच सतरंज्या उचलण्याची वेळ येईल, अशी जळजळीत टीका खासदार इम्तियाज जलील यांनी माजी मंत्री राजेश टोपे यांच्यावर केली आहे.

एमआयएम पक्षाला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घेण्याबाबत चर्चा सुरू असतानाच टोपे यांनी, एमआयएम हा जातीयवादी पक्ष आहे आणि आमचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष आहे, असे विधान केले आहे. त्यावरून जलील यांनी त्यांच्यावर सडेतोड टीका केली आहे.

आम्हाला तुमची धर्मनिरपेक्षता चांगलीच कळून चुकली आहे. आजपर्यंत तुम्ही मुस्लिमांची मते खात आलात. त्यासाठी एखादे नगरसेवकपद आणि जिल्हा परिषद सदस्यपद याची लालुच द्यायची, अशी तुमची पद्धत आहे. खरे धर्मनिरपेक्ष असतात तर औरंगाबाद मधून मुस्लीम खासदार निवडून आणला असता, अशी टीका जलील यांनी केली.

आता इम्तियाज जलील खासदार म्हणून निवडून आला आहे. आम्ही मुस्लीम समाजात स्वाभिमान आणि आत्मविश्वास निर्माण केला आहे. आता तुम्ही वर बसणार आणि आम्ही खाली, हे चालणार नाही. आता आम्ही तुमचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या मांडीला मांडी लावून बसू अशी क्षमता सिद्ध केली आहे, असेही जलील म्हणाले.

औरंगाबादच्या महालगावमध्ये आदित्य ठाकरे यांच्या गाडीच्या ताफ्यावर दगडफेक

औरंगाबाद : प्रतिनिधी

शिवसेना आमदार आदित्य ठाकरे सध्या औरंगाबाद दौऱ्यावर आहेत. आदित्य ठाकरे आणि अंबादास दानवे यांच्या गाडीसमोर काहीजणांनी गोंधळ घातला आहे. डीजे बंद केल्याच्या रागात काही लोकांकडून गोंधळ घालण्यात आल्याचं समजतेय. महालगाव येथे आदित्य ठाकरेंचा कार्यक्रम आणि रमाईंची मिरवणूक एकावेळी सुरु झाली होती. अशावेळी रमाईंची मिरवणूक थांबवल्यानं किरकोळ दगडफेक झाली. अशात बाहेर काही काळ गोंधळ बघायला मिळाला. काही जणांनी आदित्य ठाकरे यांच्या ताफ्यावर दगडफेक केल्याचेही समोर आलेय. त्याशिवाय काही लोकांनी पपईचे तुकडे त्यांच्या गाडीच्या ताफ्यावर फेकल्याचं समोर आले आहे. यामुळे काही वेळ तिथं तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती. सध्या तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे.

आदित्य ठाकरे आज महालगाव, वैजापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांची सभा झाली. त्यावेळी त्यांच्या गाडीवर आणि सभेच्या ठिकाणी किरकोळ दगडफेक झाल्याचं समोर आलेय. महालगाव येथे शिवसंवाद यात्रेचा मेळावा होत असताना या बाजूलाच रमाबाई यांची जयंती साजरी केली जात होती. सभा सुरु असल्याने बाजूला रमाबाई यांच्या जयंतीनिमित्त सुरु असलेली मिरवणूक आणि डीजे थांबवण्याची विनंती पोलिसांनी भीमसैनिकांना केली. यावेळी चिडलेल्या भीमसैनिकांनी रोष व्यक्त करत सभेच्या दिशेने किरकोळ दगड स्टेजवर फेकले. परिसरात तणाव झाल्याचं बघता यावेळी चंद्रकांत खैरेंनी आपलं भाषण आटोपतं घेतलं. आदित्य ठाकरे भाषणाला उभे राहताच त्यांनी स्टेजवर भाषण न करता खाली उतरून भाषण केलं. भाषणाच्या सुरवातीलाच आदित्य यांनी दिलगिरी व्यक्त करून तुम्ही डीजे वाजवून जयंती साजरी करा, असं देखील म्हटले. भीमशक्ती-शिवशक्ती एकच आहे, तुम्हाला जर डीजे वाजवायचा असेल तर वाजवा, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

मेळावा संपल्यानंतर जयंती साजरी करत असलेल्या लोकांनी आदित्य ठाकरे आणि अंबादास दानवे यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु आदित्य ठाकरे यांची गाडी सुरक्षा रक्षकांनी व्यवस्थित बाहेर काढली. सध्या तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे.

खैरे यांचे भाषण सुरु असताना स्टेजवर फिरकावला दगड...

आदित्य ठाकरे महालगावात पोहचल्यावर त्यांचा ठाकरे गटाच्या नेत्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आला.यावेळी ठाकरे गटातील महत्वाच्या नेत्यांची भाषणे झाली. मात्र यावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे भाषण सुरु असताना अज्ञात व्यक्तीने स्टेजवर दगड भिरकावला. त्यामुळे यावेळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र खैरे यांनी आपले भाषण चालूच ठेवले. त्यानंतर सभा संपल्यावर पुन्हा एकदा आदित्य यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यापूर्वी याच गावात झाला होता राडा...

आदित्य ठाकरे यांच्या कार्यक्रमात ज्या महालगावात गोंधळ झाला आहे, त्याच महालगावात यापूर्वी शिंदे-ठाकरे गटात राडा झाला होता. शिंदे गटाचे आमदार रमेश बोरनारे एका कार्यक्रमासाठी या गावात आले असता, ठाकरे गटाने त्यांना विरोध केला होता. त्यामुळे दोन्ही गत आमने-सामने आल्याने मोठा गोंधळ उडाला होता. त्यावेळी देखील पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती आटोक्यात आणली होती. आता पुन्हा त्याच गावात आदित्य ठाकरे यांच्या गावात गोंधळ पाहायला मिळाला आहे.

धरण कोणत्या नदीवर याची माहिती नाही, ते आपणच धरण उभारल्याच्या अविर्भावात बोलतात : आ. रामराजे नाईक निंबाळकर

फलटण : प्रतिनिधी

आपण स्वतः हिर्डोशी खोऱ्यात फिरुन प्रकल्प ग्रस्तांशी संपर्क साधला, त्यांचा विश्वास संपादन केला आणि नंतर नीरा - देवघर, उरमोडी, जिहे - कठापुर वगैरे धरणांची उभारणी झाली, ही वस्तुस्थिती असताना ज्यांना हे धरण कोणत्या नदीवर त्याचीही माहिती नाही ते आपणच धरण उभारल्याच्या अविर्भावात हे पाणी ज्यांचा या प्रकल्पाशी काडीमात्र संबंध नाही त्या सांगोला, पंढरपूरला देण्याची घोषणा करतात हे आश्चर्य जनक असल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

वाठार निंबाळकर, ता. फलटण येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात अध्यक्ष स्थानावरुन मार्गदर्शन करताना आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी आ. दिपकराव चव्हाण, जिल्हा बँकेचे संचालक श्रीमंत शिवरुपराजे निंबाळकर खर्डेकर, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंद) संचालक डी. के. पवार, फलटण तालुका सहकारी दूध पुरवठा संघाचे चेअरमन धनंजय पवार, संचालक सुरेश रोमन व हणमंत चव्हाण, श्रीरंग चव्हाण, माजी सभापती रामभाऊ ढेकळे व मोहनराव लोखंडे, श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवराज कदम, कृषीतज्ञ रामदास कदम, महाराष्ट्र केसरी पै. बापूराव लोखंडे व पै. गोरख सरक, बिल्डर असोसिएशन फलटण शाखाध्यक्ष राजीव नाईक निंबाळकर, माजी उप सभापती विवेक शिंदे व दिपक गोडसे, संताजी घोरपडे, आप्पासाहेब लोखंडे, मोहनराव निंबाळकर, अशोकराव निंबाळकर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्ष अभिजीत निंबाळकर, तंटामुक्ती समिती अध्यक्ष नंदकुमार नाळे, लोक नियुक्त सरपंच सौ. सुवर्णा नाळे, उप सरपंच नेताजी निंबाळकर व ग्रामपंचायत सदस्य, पंचक्रोशीतील विविध गावचे सरपंच, सोसायटी चेअरमन आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नीरा - देवघरचे काम अपूर्ण ठेवल्याचा आरोप स्वार्थापोटी

पाणी सर्वांना मिळाले पाहिजे या विषयी दुमत असण्याचे कारण नाही मात्र तसा विचार न करता आपल्या मतदार संघातील लोकांना खूष करण्यासाठी इकडचे पाणी तिकडे देताना इथल्या लोकांवर अन्याय करता येणार नाही हे स्पष्ट करताना आयोगाच्या निर्णयानुसार दि. ३१ मे २००० अखेर राज्याच्या वाट्याचे पाणी अडविणे गरजेचे होते, मात्र शासनाच्या तिजोरीत पैसा नाही, पाणी अडविण्याचे नियोजन नाही, प्रकल्प ग्रस्तांचा विरोध, अनुशेषाचे प्रश्न उपस्थित करण्यात येत असताना आपण अपक्ष म्हणून विधान सभेत पोहोचलो आणि संपूर्ण अंधारातून मार्ग काढण्याची गरज लक्षात घेऊन यांच्याच सरकारला दुष्काळी पट्ट्यातून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या आम्ही आमदारांनी पाठिंबा देवून यांचे (भाजपा - शिवसेना) सरकार सत्तारुढ झाले, तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी फलटणच्या पाणी परिषदेत कृष्णा खोरे विकास महामंडळाची घोषणा केली, यानंतर आपण महामंडळाच्या माध्यमातून रोखे काढून आणि प्रकल्प ग्रस्तांचा विश्वास संपादन करुन लाभ क्षेत्रातील तुम्हा सर्वांच्या साथीने प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन आणि त्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पांच्या कामांना सुरुवात करुन केवळ मुदतीत पाणी अडविण्यात नव्हे तर फेर वाटपात आयोगाकडून आणखी १८० टीएमसी पाणी महाराष्ट्रासाठी वाढवून घेता आले ही वस्तुस्थिती असताना नीरा - देवघरचे काम अपूर्ण ठेवल्याचा आरोप स्वार्थापोटी केला जात असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी केले.

सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे निधीची तरतूद नाही

नीरा - देवघर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे निधीची तरतूद नाही, ती केवळ डीएसआर बदलल्याने वाढणाऱ्या खर्चास मान्यता प्राप्त झाली आहे, अद्याप राज्य शासनाचा अर्थसंकल्प मांडला गेला नाही, तो मांडल्यावर निधीची तरतूद आणि नंतर कालव्याच्या कामांना सुरुवात होऊ शकते ही वस्तुस्थिती असून उर्वरित कामांसाठी केवळ दोन अडीच हजार कोटींची आवश्यकता असताना हे ३९०० कोटींची तरतूद केल्याचे सांगून चुकीची माहिती देत असल्याचे आणि कालव्याची कामे लगेच सुरु होत असल्याचे सांगतात हे आश्चर्य जनक असल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले.

साखर कारखाना उभारला तो नीट चालवा

गेल्या २५/३० वर्षात आयुष्यातील उमेदीची वर्षे खर्ची घालुन पाटबंधारे प्रकल्प उभे केले, त्यासाठी प्रसंगी गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांशी संघर्ष करुन शिवारात पाणी पोहोचविले, या पाण्यातून सर्वत्र ऊसाचे क्षेत्र वाढत असताना श्रीराम व साखरवाडी हे दोन्ही साखर कारखाने आर्थिक गर्तेतून बाहेर काढून वाढीव क्षमतेने गाळप करतील याची व्यवस्था करुन वाढत्या ऊस क्षेत्राच्या गाळपाची व्यवस्था केली, यांनी मात्र आलेल्या पाण्याचा आणि वाढत्या ऊस क्षेत्राचा फायदा घेण्यासाठी स्वतः साखर कारखाना उभारला तो तरी नीट चालवावे, ते ही जमेना अशी टीका खासदारांचे नाव न घेता आ. श्रीमंत रामराजे यांनी केली.

आता कापसाकडे वळण्याची गरज

ऊसाचे क्षेत्र वाढत असताना जादा पाणी वापराने जमिनी खराब होत आहेत, ऊस तोडीच्या समस्या निर्माण होत आहेत, आगामी काळात ऊस तोडी साठी मशीन आणि ऊस क्षेत्रा बरोबर कापूस पिकाखालील क्षेत्रात वाढ करण्याची आवश्यकता व्यक्त करीत पूर्व भागात क्षेत्र वाढत असून तेथील शेतकरी समाधानी आहेत, तुम्हीही कापसासाठी काही क्षेत्र राखून ठेवा आपण त्यासाठी प्रयत्नशील आहोत, कापूस विक्री व प्रक्रिया यासाठी लवकरच योग्य व्यवस्था करण्याची ग्वाही यावेळी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिली आहे.

यावेळी नाबार्ड कृषी विषयक योजनांची माहिती प्रा. महेंद्र खरात यांनी शेतकऱ्यांना दिली. राजीव नाईक निंबाळकर यांचे भाषण झाले तर उप सरपंच नेताजी निंबाळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

प्रारंभी लोक नियुक्त सरपंच सौ. सुवर्णा नाळे व सहकाऱ्यांनी आ. श्रीमंत रामराजे, आ. दिपकराव चव्हाण, श्रीमंत शिवरुपराजे व मान्यवरांचे सत्कार केले. विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी करणारे स्थानिक गुणवंत, सेवानिवृत्त शिक्षक व अन्य मान्यवरांचे सत्कार यावेळी करण्यात आले.

पुणे, मुंबईसह अकलूजमध्ये विविध पदासांठी मेगाभरती : स्वरूपाराणी मोहिते-पाटील

- पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन
- १० फेब्रुवारी रोजी इंजिनअरींग कालेज येथे होणार मुलाखती

अकलूज : प्रतिनिधी

समाजात दिवसेंदिवस वाढणारी बेरोजगारीची समस्या दुर करण्याच्या दृष्टीकोनातून, जिल्ह्यातील युवक -युवतींना स्वप्नातील नोकरी मिळावी. या उद्देशाने मुंबई, पुणे यासह अकलुज परीसरातील विविध कंपन्यांमध्ये २ हजार पदांसाठी मेगाभरती शिबीराचे आयोजन केल्याची माहिती महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते- पाटील, जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, चेअरमन, स. म. शं. मोहिते-पाटील सह सा. कारखाना लि., शंकरनगर-अकलूज यांचे मार्गदशनाखाली व आ. रणजितसिंह विजयसिंह मोहिते-पाटील,यांचे सुचनेप्रमाणे सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज व महाराष्ट्र शासन, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परीषदेमध्ये स्वरुपाराणी मोहिते-पाटील या माहिती देत होत्या.यावेळी सहकार महर्षि कारखान्याचे कार्यकारी संचालक तथा शं.मो. पा.च.हास्पिटल ट्रस्ट अध्यक्ष राजेंद्र चौगुले ,अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य सागर फुले,का.अधिक्षक विक्रमसिंह बागल उपस्थित होते.

शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज, जिल्हा सोलापूर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या मेळाव्यामध्ये सोलापूर, पुणे, मुंबई (ठाणे) या शहरांसह अकलुज व माळशिरस तालुक्यातील विविध औद्योगीक क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी सहभाग दर्शविलेला आहे. अकलुजसह तालुक्यातील १३ तर बाहेरील १४ अशा सुमारे २७ विविध कंपन्यातुन ,सर्व शैक्षणिक पात्रतेच्या जागांसाठी मेगा भरती होणार आहे. दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा.इच्छुकांनी नाव नोंदणी,११ वाजता,आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते मेळाव्याचे उद्घाटन तर ११.३० वा.प्रत्यक्ष मुलाखती सुरु होणार आहेत.या भरती मेळाव्यात एकुण २०७० व त्याहून अधिक रिक्त पदे उपलब्ध असुन त्यासाठी पदे भरण्यात येणार आहेत.

या मेगा भरतीसाठी किमान १० वी, १२ वी, आय. टी. आय, बी. ए. (इ.अ.), बी. कॉम. (इ.उे), बी. एससी. (इ.डल.), डिप्लोमा इंजिनिअरींग, डिग्री इंजिनिअरींग (इ.ए., B.Tech.), इउअ, इउड, इइअ, बी. एससी. नर्सिंग GNM² / ANM² / ¦MLT/ MLT /PG¦MLT qH$dm Any GA°aduate (पदवी), एम. ए., एम. कॉम., एम. एससी., MCA, MCS, MBA, Any Post GA°aduate (पदव्युत्तर पदवी) इत्यादी प्रकारच्या विविध शैक्षणिक पात्रता धारक सोलापुर जिल्ह्यातील उमेदवारांसाठी संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तरी नोकरी इच्छुक सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींनी आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ठिक १० वाजता सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज, जिल्हा सोलापूर'' या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मुलाखतीसाठी उपस्थित राहुन संधीचा लाभ घेण्याचे अवाहन स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी केले आहे. तसेच काही अडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा,असेही सांगितले .

या मेगा भरतीसाठी एशियन मॅनपॉवर कन्सल्टन्सी सोलापूर,टाटा स्ट्राईव्ह, पुणे,किरण एन्टरप्राईसेस, सोलापूर स्वमीरत्न रिसोर्स मॅनेजमेंट प्रा.लि. सोलापूर, ग्राम तरंग टेक्निकल, व्होकेशनल एज्यूकेशन ॲंड ट्रेनिंग प्रा.लि. पुणे. एल. आय. सी. ऑफ इंडिया सोलापूर, NIIT लिमिटेड, मुंबई, चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रा.लि. सोलापूर,सुमित फॅसेलेटी, पुणे, लिओ कन्सल्टींग प्रा. लि. ठाणे. आर के एन्टरप्राईसेस, सोलापूर,साई श्रध्दा ग्रुप, पुणे तळेगाव, सहकार महर्षि सह.साखर कारखाना ,महर्षी अपेरिअल, मार्केट यार्ड,अकलूज,समाजीराजे पार्क, अकलूज,एस. जी. गिअर,टेंभुर्णी , एमआयडीसी,फ्रटेली वाईन्स प्रा. लि.झंजेवाडी, माळशिरस,युनीगोल्ड पॅकेजिंग, लोणी-इंदापूर एमआयडीसी, कोहिनूर इंडस्ट्रीज, लोणी- इंदापूर, एमआयडीसी,सहकार असोसिएट्स, अकलूज, भरणे ऑटोलाईन्स, माळेवाडी, अकलूज (महिंद्रा शोरुम),अक्षता इंटरप्राईजेस,माळेवाडी, अकलूज, भास्करे इन्फोटेक, अकलूज,श्रीराम मोटर्स, अकलूज (न्यू हॉलांड शोरुम),विघ्नहर्ता इंडस्ट्रीज, अकलूज (आरोग्यम् वॉटर), योगीराज इंडस्ट्रीज, बारामती । एमआयडीसी इत्यादी कंपनींचा या मेळाव्यात सहभाग आहे.

शिवरत्न पॅटर्नच्या वतीने दि.११ रोजी

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

अकलूज : प्रतिनीधी

अकलूज शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलीत शिवरत्न पॅटर्न, अकलूज च्या वतीने दहावी व बारावी नंतर करीयरच्या संधी या विषयावर विद्यार्थी व पालक यांच्यासाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा करीता शिक्षणतज्ज्ञ सारिका मोहन पाटील यांचे मार्गदर्शन सेमिनारचे शनिवार दि.११/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्मृतिभवन शंकरनगर अकलूज येथे आयोजन करण्यात आले आहे.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा या निर्णायक वळणावर करिअरच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे यासाठी संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांकरीता करिअरच्या विविध वाटा, व त्यासाठी आवश्यक असलेली पात्रता याबाबत सखोल मार्गदर्शन. प्रवेश प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजेच आपली कागदपत्रे ही कागदपत्रे कोणती असावीत व त्याची वैधता काय असते याबाबत संपूर्ण मार्गदर्शन या सेमीनारमध्ये केले जाणार आहे.

Neet/JEE/MHCET परीक्षांना सामोरे जाताना येणाऱ्या अडचणींबाबत सखोल मार्गदर्शन.

दहावी व बारावी नंतर कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा? कोणतं करिअर निवडायचं? असे प्रश्न प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या मनात असतो.

तुमच्याकडे असलेल्या क्षमता, मिळणारे ज्ञान, या क्षेत्रातील आव्हानं तसचं तुमच्या अभ्यासाचा उपयोग हे पाहून करिअर निवडावे. त्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची गरज असते. हीच मानसिकता हेरून, शिवरत्न पॅटर्न, अकलूज च्या वतीने करिअर मार्गदर्शन सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले आहे.

---

१ लाख लिटर दुधाच्या बायप्रोडक्टचे उद्दिष्ट : धैर्यशिल मोहिते-पाटील

शिवामृत दूध संघाचा द्वितीय पारितोषिक वितरण समारंभ महाबळेश्वरमध्ये मोठ्या उत्साहात पार

अकलूज : प्रतिनिधी

कोरोना काळात दुध व्यवसायास मोठ्या प्रमाणात घट झाली होती. परंतू शिवामृत दूध संघाच्या वितरकांच्या सहकार्यामुळे व दूध उत्पादक शेतकऱ्यांचा संघावरील विश्वासामुळे पुन्हा शिवामृतच्या दूध उत्पादनास चांगले दिवस येत आहेत. आज २० हजार लिटर दूधामध्ये दुग्धजन्य पदार्थ बनवित असलो तरी भविष्यात १ लाख लिटर दुधापासून दुग्धजन्य पदार्थ बनविण्याचा आमचा मानस आहे. एकनिष्ठ वितरकांमुळेच हेच शक्य होणार असल्याचे शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले.

शिवामृत दूध संघाच्या सर्वाधिक दुग्धजन्य पदार्थ विक्री प्रकारात अकलूज येथील श्रीकृष्ण डेअरीचे नागेश सिद्राम साठे यांनी टॉप परफॉर्मन्सचा बहुमान पटकावित ॲक्टीव्हा गाडीचे मानकरी ठरले. *कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले बँक ऑफ बडोदा चे असिस्टंट जनरल मॅनेजर जनार्दन निजासुर यांच्या हस्ते

त्यांना सन्मानीत करण्यात आले.

सुप्रसिद्ध मोटिवेशनल स्पीकर व संघाचे कन्सल्टंट अनिष सहस्त्रबुद्धे यांनी शिवामृत संघाचे सुपरस्टार, डीलर यांना उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य नियोजन कसे करावे, दुसऱ्याच्या चुका शोधण्यापेक्षा आपल्यामध्ये होणाऱ्या चुका दुरूस्त करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल कशी करावी, संघाशी एकनिष्ठ रहावे, आपल्या चुकीचे खापर दुसऱ्यावर फुटू नये याबाबत प्रबोधन केले.

दुग्धजन्य पदार्थ टॉप परफॉर्मन्स द्वितीय क्रमांक गुरुनाथ सदगीर, तृतीय क्रमांक रज्जाक तांबोळी, दूधामध्ये टॉप परफॉरमन्स प्रकारात प्रथम गणेश गायकवाड, द्वितीय क्रमांक सुभाष पाटील, तृतीय क्रमांक सुधाकरराव देशमुख, न्यू अर्निंग स्टार प्रकारात प्रथम क्रमांक प्रकाश एकतपुरे, द्वितीय क्रमांक सचिन सूर्यवंशी यांनी पटकाविला. पॅकींग दूध विक्री प्रकारात बेस्ट अप्रिशिएशन ३, बेस्ट परफॉर्मन्स् २१, टॉप परफॉर्मन्स् ३ असे २७ व दुग्धजन्य पदार्थ विक्री प्रकारात बेस्ट रिटेलर ॲवॉर्ड ५, बेस्ट परफॉर्मन्स् १८, टॉप परफॉर्मन्स् ३, न्यू अर्निंग स्टार २ असे एकूण २८ पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महाबळेश्वर येथे शिवामृत दूध संघाचा द्वितीय पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील, व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे, माजी बार कौन्सिल अध्यक्ष ॲड.नितीन खराडे, सीनियर ॲड.दिलीव फडे, ॲड.बी.आर. भिलारे, संघाचे संचालक हनुमंत शिंदे, हरिश्चंद्र मगर, संग्रामसिंह रणनवरे, भास्कर तुपे, अरुण थिटे, बाळासाहेब पराडे, जगन्नाथ जाधव, शरद साळुंखे, सुभाष शिंदे, पोपट बर्वे, बाळासाहेब देशमुख, त्रिंबक इंगळे, विजय नरोटे, सुरेश पिसे, सचिन वाघमोडे, अरविंद भोसले, संजय गोरे, दादासाहेब शिंगाडे, कार्यकारी संचालक रविराज इनामदार देशमुख, सेक्रेटरी दिग्वीजय माने-पाटील आदी उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी बाबर यांचा आदेश केला रद्द

सुलभा वठारे यांच्यावर हाय कोर्टाचे ताशेरे

सोलापूर : प्रतिनिधी

माध्यमिकचे शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर यांनी दिलेला आदेश रद्द करणे प्रभारी शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांना महागात पडले आहे. सोलापूर सोशल उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकांच्या बाबतीत निर्णय देताना हायकोर्टाने प्रभारी शिक्षण अधिकारी सुलभा वठारे यांच्यावर ताशेरे ओढले आहेत.

सोलापूर सोशल असोसिएशन ही शहरातील मुस्लिम धर्मियांची अल्पसंख्यांक संस्था आहे. या संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. अखलाक वडवान ५ ऑगस्ट २०१२ पासून काम पाहत आहेत. संस्थेच्या दर तीन वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत ते सातत्याने निवडून येत आहेत. या संस्थेला भारतीय घटनेच्या आर्टिकल ३ (१) नुसार

अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा शासनाने दिला आहे. या संस्थेअंतर्गत चालणाऱ्या शाळा व कॉलेजच्या प्रमुख पदावर स्वत:च्या मर्जीतील मुख्याध्यापक किंवा प्राचार्य नियुक्त करण्याचा विशेषाधिकार व्यवस्थापनाला आहे. शैक्षणिक सत्राच्या मध्य काळात एखादा मुख्याध्यापक किंवा शिक्षक निवृत्त होत असल्यास विद्यार्थ्यांचे हित पाहून शैक्षणिक सत्र अखेर अशा कर्मचाऱ्यास पुर्ननियुक्ती देण्याचा अधिकार नियम १९८१ चे नियम १७ (२) अन्यवे प्राप्त असतात. या अधिकाराचा वापर करून डॉ. अखलाक वडवान यांनी मुख्याध्यापकपदी शेख यांना १४ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली होती. याला माध्यमिक शिक्षण अधिकारी भास्करराव बाबर यांनी मान्यता दिली होती. पण या नियुक्तीला अल्ताफ जमादार व इतरांनी हरकत घेतली. डॉ. अखलाक वडवान हे संस्थेचे कायदेशीर अध्यक्ष नाहीत, संस्थेला कायदेशीर विश्वस्त मंडळ अस्तित्वात नाही

अशा गंभीर आरोप तक्रारीत केला. यावर प्रभारी शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांनी अब्बुल शेख यांच्या मुदतवाढीबाबत शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर यांनी काढलेला आदेश ३० डिसेंबर रोजी रद्द केला. वठारे यांच्या आदेशाविरूद्ध शेख यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. तक्रारदार अल्ताफ जमादार व इतरांनीही हस्तक्षेप याचिका दाखल केली. पण याची दखल न घेता खंडपीठाने शेख यांची याचिका मंजूर करून प्रभारी शिक्षणाधिकारी वठारे यांनी दिलेला आदेश रद्दबातल ठरविला. वठारे यांनी काढलेला आदेश हा मनमानी पद्धतीचा व कायद्याचा उल्लंघन करून हा आदेश काढल्याच निष्कर्ष नोंदवत त्यांच्यावर गंभीर ताशेरे ओढले.

समाजवादाच्या मार्गाने कामगार देशाचा मालक बनेल : कॉम्रेड डॉ. राम बाहेती

बार्शी : प्रतिनिधी

''समाजवादाच्या मार्गाने कामगार देशाचा मालक बनेल त्यासाठी भांडवली धर्मांध शक्ती विरुद्ध आवाज बुलंद करावा लागेल,'' असे मत भाकपचे राज्य सचिव कॉम्रेड डॉ. राम बाहेती यांनी व्यक्त केले. बार्शीत झालेल्या या बैठकीमध्ये २० फेब्रुवारी रोजी कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हल्लेखोरांचा शोध घ्या, या मागणीसाठी मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

कॉम्रेड डॉ. राम बाहेती म्हणाले ''जगभर उजव्या शक्तिनी थैमान घातले आहे, त्याचाच भाग भाजपा आहे, भांडवली व्यवस्था मंदीच्या गर्तेत आहे, बहुराष्ट्रीय कंपन्याचा फायदा व्हावा यासाठी शेजारील राष्ट्रांची दुश्मनीचा खेळ करून युद्ध केले जात आहे, यातून हत्याराचा धंदा तेजीत आणला आहे, अशा परिस्थितीत जगात कम्युनिस्ट श्रमिकांची राज्य देखील सत्तेवर येत आहेत हा आशावाद आहे. कम्युनिस्ट सत्तेतील देशांनी कोरोना काळात जनतेला साथ दिली केरळ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

देशात धर्मांध भाजप सत्तेवर बसल्यापासून दलित, अल्पसंख्याकांवरील अत्याचार वाढले, बेरोजगारी, आरोग्याचा , शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, सीएए , एनआरसी निर्माण करणे, ३७० कलम रद्द करणे , धर्माधर्मात संघर्ष वाढणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी , महिलांवरील अत्याचार , कोरोना काळात व नंतर श्रमिक वर्ग उध्वस्त होणे, मानवनिर्देशांकात देश खाली येणे, आदानीचा शेअर मार्केट घोटाळा यात एलआयसी चे कोटी रुपये बुडणे हे सुरू आहे भाजप जनतेला राष्ट्रवादाच्या नावाने मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याविरुद्ध कम्युनिस्ट पक्ष पुढील काळामध्ये तीव्र संघर्ष उभा करेल.'' असे ते म्हणाले.

यावेळी मंचावर अध्यक्ष मंडळात कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे, ए. बी. कुलकर्णी, लहु आगलावे हे होते. प्रास्ताविक सचिव कॉम्रेड डॉ. प्रवीण मस्तुर तर स्वागत सहसचिव कॉम्रेड नवनाथ कांबळे, आभार सहसचिव सतीश गायकवाड यांनी मांडले. यावेळी कॉम्रेड अनिरुद्ध नखाते, भारत भोसले, बालाजी शितोळे, आनंद धोत्रे, धनाजी पवार, रशिद इनामदार, दत्तात्रय कोकरे, शहापरी शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

वाघमारे कुटुंबासाठी दु:खातून आनंदाचा क्षण...



अकलूज : प्रतिनिधी

निमगाव विद्यामंदिर निमगाव येथील मुख्याध्यापक हनुमंत वाघमारे सर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले आहे. ते आपल्या सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक सेवक सहकारी पतसंस्था बाळे या पतसंस्थेचे सभासद होते. या सोसायटीमध्ये संजीवनी ठेव योजनेच्या माध्यमातून कै. वाघमारे सरांच्या वारसांना आज दहा लाख रुपयांचा चेक शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

पतसंस्थेचे मार्गदर्शक मा. आ. श्री. दत्तात्रय सावंत सर याच्या कल्पनेतून आलेल्या संजीवनी ठेव योजनेचा लाभ जिल्ह्यातील अनेक लोकांना झाला आहे. गेलेला माणूस माघारी येऊ शकत नाही परंतु आपल्या पतसंस्थेमार्फत त्यांच्या कुटुंबावर येणाऱ्या आर्थिक संकटातून बाहेर काढले जाते. महाराष्ट्रत एकमेव पतसंस्था आहे जी सभासदांच्या अकस्मात निधनानंतर दहा लाख रूपये वरासाना देते. समाजातील सर्व स्तरातून या संजीवनी ठेव योजनेचे व मा.आ सावंत सरांचे अभिनंदन केले जात आहे.

यानिमित्ताने पतसंस्थेचे चेअरमन श्री. समाधान घाडगे, निमगाव शाळेचे अध्यक्ष श्री. इनामदार सर, संचालक बिभीषण जाधव, तात्यासाहेब काटकर, मार्गदर्शक श्री. समाधान दुधाट सर, आसबे सर, सुरवसे सर यांच्या प्रयत्नातून वाघमारे कुटुंबासाठी दु:खातून आनंदाचा क्षण आला आहे.

जयतपाड येथे वडाच्या पारंब्याला लटकून तरुणाची आत्महत्या

- घातपात की आत्महत्या पोलीस तपास सुरू

भोर : प्रतिनिधी

भोर तालुक्यातील दुर्गम डोंगराळ वेळवंड खोऱ्यातील जयतपाड येथे वाढेश्वर मंदिरा समोरील वडाच्या झाडावर गळ्या भोवती पारंब्या गुंडाळून गळफास घेतलेला अनोळखी तरुण लटकत असताना ग्रामस्थांना आढळला. ही घटना सोमवार (दि.६) रोजी घडली असून ग्रामस्थांनी पोलीस पाटीलामार्फत पोलिसांशी संपर्क साधून झाडावर लटकत असलेला अनोळखी व्यक्तीचा मृतदेह पोलिसांच्या ताब्यात दिला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जयतपाड (ता. भोर) येथे ग्रामदैवत असलेल्या वाढेश्वर मंदिरा समोरील वडाच्या झाडावर गळ्याभोवती पारंब्या गुंडाळून गळफास घेतलेला अनोळखी व्यक्ती सकाळी ग्रामस्थांना आढळला पोलीस पाटील यांच्या मार्फत भोर पोलिसांशी संपर्क साधून घटना कळविल्यानंतर काही वेळातच पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिस व स्थानिक लोकांच्या मदतीने वडाच्या झाडावर लटकत असलेला मृतदेह खाली ताब्यात घेतला असता या अनोळखी तरुणाच्या अंगावरील पँटच्या डाव्या खिश्यात आधार कार्ड मिळून आले ते पाहिले असता त्यानुसार सदर मृतदेह नारायण धाधू गझु (वय ३४ रा. रामजडी बांसजोर सिमडेगा बांसजोर झारखंड सध्या रा. जयतपाड ता. भोर) असे सिद्ध झाले असून अद्याप आत्महत्येचे कारण समजू शकले नाही मात्र ही आत्महत्या की घातपात याचा पुढील तपास भोर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली महीला पोलीस हवालदार वर्षा भोसले करीत आहेत.

काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी आयुब पठाण यांची निवड

उस्मानाबाद : प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते आयुब अजीजखान पठाण यांची उस्मानाबाद जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा माजी मंत्री बसवराज पाटील, माजी मंत्री तथा जेष्ठ नेते मधुकरराव चव्हण यांनी नूतन अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष आयुब पठाण यांचा सत्कार करून करुन पुढील वाटचालीस सदिच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना, दिलेली जबाबदारी व काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणानुसार संघटन मजबूत करण्याचे काम करीन, असे पठाण यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा काँग्रेस कार्याध्यक्ष खलील सय्यद, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक महेबुबपाशा पटेल, जिल्हा सरचिटणीस ॲड जावेद काझी, रशीद कोतवाल व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

रेशन विक्रेत्यांचा सातारा जिल्ह्यात ७२ तासांचा संप सुरू

राज्य शासनाला पुन्हा मागण्यांच्या संदर्भात 'अल्टीमेटम'

सातारा : प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील सुमारे १६७० रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक विक्रेत्यांनी मंगळवारपासून ७२ तासाचा पॉज मशीन बंद हे आंदोलन सुरू केले आहे .त्यामुळे तब्बल तीन दिवस मोफत धान्य वितरण हे ठप्प राहणार आहे परिणामी संबंधित खातेधारकांची चांगलीच अडचण झाली आहे ऑल इंडिया फेयर प्राईज शॉप डीलर फेडरेशन यांच्या मार्गदर्शनांतर्गत या मागण्या संदर्भात पुन्हा बुधवार दिनांक ८ रोजी औरंगाबाद येथे बैठक होत आहे या बैठकीमध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरणार असल्याचे स्वस्त धान्य धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत शेटे यांनी सांगितले.

ऑनलाईन सर्वर मध्ये सातत्याने बिघाड होत असल्याने पॉज मशीन व्यवस्थित चालत नाही त्यामुळे ग्राहकाला दोन दोन तास थांबावे लागते आणि ग्राहक आणि दुकानदार यांच्यात वारंवार वादावादीचे प्रसंग उद्भवतात गोडाऊन मधून दुकानदारकांना येणारे धान्य मोजूनच मिळते दुकानदाराकडे धान्याची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांमध्ये काटा वजन काटा असावा काही वेळा वाहनधारक गाडीमध्ये वजन काटा असूनही वजन करून देण्याचे टाळाटाळ करतात धान्याची गोणी फाटत असतात ती सुद्धा शिवून मिळत नाही परिणामी त्याचे नुकसान धान्य दुकानदार विक्रेत्यांना उठवावे लागते कमी कार्ड संख्या असल्याने परवानाधारकास अल्प उत्पन्नामध्ये व्यवसाय करणे अडचणीचे होते. त्यामुळे परवानाधारक प्रत्येक दुकानदाराला समप्रमाणात कार्ड देण्यात यावीत दुकानांमध्ये ग्राहकांना सेवा प्रदान करतेवेळी एखाद्याने शांतता भंग केल्यास दुकानदारास तात्काळ संरक्षण मिळावे मोफत धान्य वाटप योजना एक जानेवारी २०२३ पासून सुरू झाल्याने संबंधित रेशन दुकानदारांना एक रुपया सुद्धा मिळणार नाही त्यामुळे दुकानदाराची आर्थिक कोंडी होणार आहे त्यामुळे इतर खर्च दुकानदार आणि कसे भागवायचे हा सुद्धा मोठा प्रश्न आहे.

या मागण्यांना वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य रास्त धान्य दुकानदार आणि केरोसीन वाटप विक्रेत्यांची बैठक औरंगाबाद येथे होत आहे येथे आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली जाणार आहे सातारा जिल्ह्यातील सुमारे ५०० हून अधिक विक्रेते या बैठकीसाठी औरंगाबादला रवाना झाले आहेत मंगळवारपासून ते गुरुवारपर्यंत पॉज मशीन बंद आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे सुमारे १६७० रेशनिंग धान्य व केरोसीन वाटप विक्रेते या आंदोलनात सहभागी झाले आहेत परिणामी तीन दिवस ही दुकाने बंद राहणार असल्याने खातेधारकांची चांगली अडचण झाली आहे मोफत धान्य वितरण प्रणाली तीन दिवस ठप्प राहणार आहे .

जिल्हा पुरवठा शाखेने या आंदोलनाची गंभीर दखल घेतली आहे या संदर्भात काहीतरी मध्यम मार्ग काढण्यात येईल आणि त्यांच्या मागण्यांचा योग्य तो विचार केला जाईल असे जिल्हा पुरवठा शाखेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

चुकीच्या मार्गाने मिळालेली सत्ता जास्त काळ टिकत नाही

▪ माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांचा सत्ताधाऱ्यांना टोला

कोरेगाव : प्रतिनिधी

शिवसेनेतील काही आमदारांना प्रलोभन दाखवून आपल्या बाजूला घेऊन राज्यात सरकार स्थापन केले आहे. पण चुकीच्या मार्गाने मिळवलेली सत्ता जास्त काळ टिकणार नाही असा सणसणीत टोला माजी जलसंपदा मंत्री आमदार जयंत पाटील यांनी लगावला.

दुर्गळवाडी तालुका कोरेगाव येथील बोरबन सर्वोदय पाणीपुरवठा इमारतीच्या संस्थेला पन्नास वर्षे पूर्ण झाली. याबद्दल संस्थेच्यावतीने संस्थेचे नूतन कार्यालयातील माजी आमदार पी. डी. पाटील यांच्या तैलचित्राचे अनावरण व स्मरणिका प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सहकार व पणनमंत्री आमदार बाळासाहेब पाटील हे होते. व्यासपीठावर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनिल माने, कोरगांव तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष शहाजीराव क्षिरसागर, संचालक कांतीलाल पाटील, संचालक जसराज पाटील, संस्थेचे मुख्य प्रवर्तक बाबासो मोरे, चेअरमन मोहन यादव, मानसिगराव जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पुढे ते म्हणाले राज्यातील सर्वच कार्यकर्त्यांना सत्ताधाऱ्यांचा खोटेपणा कळला असून त्यांच्या पाठीमागे जनता नाही हे नुकत्याच झालेल्या निवडणुकीत दिसून आले आहे त्यामुळे कार्यकर्त्यांनी कोणत्याही दबावाला आमिषाला बळी न पडता राष्ट्रवादीच्या पाठीमागे आपली ताकद उभी करावी हे सरकार जास्त काळ टिकणार नाही न्यायालयाचा निकाल आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहित १६ आमदार अपात्र होतील त्यावेळी हे सरकार गडगडेल आणि त्याचवेळी आत्ता जे पक्ष सोडून जात आहेत ते परत पक्षात माघारी येतील. गावातील पारावर सुद्धा या आमदारांनी घेतलेल्या पैशाची चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व शिवसेना महाविकास आघाडी इथून पुढे निवडणुकीला एकत्रित सामोरे जाणार आहे.

आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले स्वर्गीय लोकनेते राजारामबापू पाटील व स्वर्गीय पी. डी. पाटील यांनी जनतेच्या विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून साखर कारखाने उभे केले त्याचबरोबर शेतीला पाणी मिळावे यासाठी अनेक पाणी उपसा योजना सुरू केल्या दुर्गळवाडी येथील बोरबन सर्वोदय सहकारी पाणी योजनेला स्वर्गीय पी. डी. पाटील यांनी सह्याद्री कारखान्याच्या माध्यमातून उर्जित अवस्था आणली या गावातील बाबासो मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत कष्टाने ही संस्था उभी केली आहे ती संस्था सध्याची तरुण पिढी चांगल्या पद्धतीने चालवीत आहे.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक व सह्याद्रीचे माजी संचालक बाबासो मोरे म्हणाले की १९७१ साली संस्था सुरू केली त्या काळात या पाणी उपसा जलसिंचन योजनेसाठी लागणारी वीज तत्कालीन विद्युत पुरवठा मंत्री लोकनेते राजारामबापू पाटील यांनी तातडीने मंजूर करून दिले होते. दुर्गळवाडीतील सहकाऱ्यांच्या अथक कष्टातून गेली पन्नास वर्षे ही संस्था कार्यरत आहे म्हणून पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानंतर आमदार जयंत पाटील यांच्या हस्तेच या स्मरमकीचेचे प्रकाशन व्हावे हा आमचा मानस होता.

यावेळी कांतीलाल पाटील, जिल्हाध्यक्ष सुनिल माने यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी सजवलेल्या बैलगाडीतून मान्यवरांची मिरवणूक काढण्यात आली. प्रास्ताविक किशोर यादव सुत्रसंचालन दिपक साबळे यांनी केले तर आभार विठ्ठल मस्कर यांनी मानले.

रेल्वेच्या तरतुदीमध्ये महाराष्ट्रासाठी १३५३९ कोटींचा विक्रमी निधी

भाजपा जिल्हाध्यक्ष आ. जयकुमार गोरे यांनी मानले पंतप्रधानांचे आभार

सातारा : प्रतिनिधी

२०२३- २०२४ साठीच्या सादर झालेल्या अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी रेल्वेच्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी विक्रमी तरतूद केली आहे.या पूर्वीच्या सन २००९ ते २०१४च्या दरम्यान महाराष्ट्राला फक्त ११७१ कोटींच्या तरतूद केली होती, याउलट सन २०२३-२४ या फक्त एकवर्षाच्या अर्थसंकल्पात भरीव अशी १३५३९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही या पूर्वीच्या तरतुदींच्या ११.६ पटींनी जास्त आहे.यामध्ये महाराष्ट्रातील १२३ रेल्वे स्थानके अत्याधुनिक होणार आहेत. या यादीत जिल्यातील सातारा, कराड व लोणंद रेल्वे स्थानकाचा समावेश करण्यात आलेला आहे. अशी माहिती भाजप जिल्हाध्यक्ष आमदार जयकुमार गोरे यांनी देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत .

आ. जयकुमार गोरे पुढे म्हणाले, ''सध्या आपल्या राज्यात पस्तीस रेल्वे प्रकल्पांवर कामे चालू आहेत ज्यामध्ये सुमारे ६१४२ किमी ची कामे आहेत यांची किंमत ९१११३७ कोटी रु होते, चालू असलेल्या कामामध्ये सातारा जिल्यातून जाणाऱ्या मिरज-पुणे रेल्वे मार्गाने दुहेरीकरण व विद्युतीकरण याचा समावेश आहे.तसेच जिल्यातील सर्व रेल्वे क्रॉसिंग च्या जागेवर उड्डाणपूल बांधण्याची कामे चालू आहेत. या कामामुळे वाहतूक खोळंबा व अपघात टाळण्यास मदत होणार आहे. तसेच या वर्षीच्या अर्थसंकल्पात नवीन १८ मार्गांचे तांत्रिक , आर्थिक सर्वेक्षण पण प्रस्थावीत आहे. तसेच राज्यशासनाच्या भागीदारीने देखील अनेक नवीन रेल्वे मार्गांचे कामे केली जाणार आहेत, ज्यामध्ये जिल्यातील फलटण- पंढरपूर मार्गाचा समावेश आहे. तसेच कोल्हापूर- वैभववाडी या

कोकणाला जोडणाऱ्या मार्गाचा देखील समावेश आहे. या व्यतिरिक्त राज्यात ७४ स्थानकांवर एक स्थानक एक वस्तू या योजनेत समावेश केला आहे, यामुळे स्थानिक वस्तुंना हक्कही बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

अशा पद्धतीने पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात राज्यामध्ये रेल्वेची घोडदौड जोरात चालू आहे. सध्या राज्यात अनेक मार्गावर वंदे भारत या रेल्वेचे नियोजन करण्यात आले आहे. यातील काही मार्गांवर यापूर्वीच या नवीन प्रकारच्या रेल्वे चालू झाल्या आहेत. राज्यात रेल्वेच्या विविध प्रकल्पासाठी भरीव व विक्रमी तरतूद केल्याबद्दल जिल्हाध्यक्ष मा. आ. जयकुमार गोरे यानि संपूर्ण जिल्हावासीयांच्या वतीने धन्यवाद दिले आहे.

वांगना नदीवरील पुलासाठी नाबार्ड अंतर्गत ३ कोटी ५० लक्ष मंजूर : आमदार शशिकांत शिंदे

कोरेगाव : प्रतिनिधी

कोरेगाव विधानसभा मतदार संघातील जांब ल्हासुर्णे कोरेगांव कुमठे सांगवी चिमणगांव भंडारमाची रस्ता इजिमा ७९ किमी ५ / ६०० मध्ये वांगना नदीवर लहान पुलाचे बांधकाम करणे या रस्त्यावरील पुलाचे बांधकामासाठी आ. शशिकांत शिंदे यांनी सततचा पाठपुरावा करुन रक्कम रु. ३५०.०० लक्ष. नाबार्ड २८ अंतर्गत मंजुर करण्यात आले आहेत.

कोरेगाव विधानसभा मतदार संघातील वांगना नदीवर लहान पुलाचे बांधकामासाठी आ. शशिकांत शिंदे यांनी सततचा पाठपुरावा करुन रु.३ कोटी ५० लक्ष निधी नाबार्ड २८ मधुन मंजुर करण्यात आला आहे. लवकरच निविदा प्रक्रिया होऊन कामास प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. ग्रामीण भागातील अत्यंत महत्वपुर्ण अशा पुलाच्या कामासाठी आ. शशिकांत शिंदे यांनी पाठपुरावा केला असुन सदर कामे झाल्यानंतर दळणवळण सुलभ होण्यास मदत होणार आहे. भविष्यातही कोरेगांव विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी विविध योजनेतुन निधी आणण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.

सातारा जिल्हा पोलिसांची वैराटगडावर स्वच्छता मोहीम

सातारा : प्रतिनिधी

सातारा जिल्हा पोलिसांच्या वतीने आपले किल्ले आपली जबाबदारी या उपक्रमांतर्गत किल्ले वैराटगड येथे गडभ्रमंती आणि स्वच्छता मोहीम राबवण्यात आली या मोहिमेमध्ये वाई उपविभागातील वाई पाचगणी महाबळेश्वर मेढा या पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता या मोहिमेदरम्यान जैविक अजैविक असा ८० किलो कचरा गोळा करण्यात आला.

वैराटेश्वर मंदिर सभा मंडपात राहुल गोळे, रोहन भोसले यांनी वैराटगडाबद्दल गड संवर्धन आणि ऐतिहासिक महत्त्व याची माहिती दिली. पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक बापू बांगर वाईच्या उपविभागीय पोलीस अधिकारी शितल जानवे वाई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे, भुईंज पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, मेढा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर पाचगणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आरजे माने, महाबळेश्वर चे पोलीस उपनिरीक्षक एस एस बिजली बारा पोलीस अधिकारी सत्तर पोलीस हवालदार व ११५ नागरिक विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

दिनांक १५ जानेवारी पासून सातारा पोलीस दलामार्फत आपले किल्ले आपली जबाबदारी या मोहिमांतर्गत अजिंक्यतारा वसंतगड जरंडेश्वर अशा तीन किल्ल्यांची स्वच्छता करण्यात आली. वैराटगड मोहीम ही चौथ्या क्रमांकाची होती या मोहिमेत आज अखेर ६० पोलीस अधिकारी ३६९ पोलीस अंमलदार व ६९० नागरिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून ५४४ किलो कचरा गोळा केला आहे सातारा जिल्हा पोलीस दर रविवारी जिल्ह्यातील एक किल्ला निवडून सदरची मोहीम राबवण्यात येणार आहे या मोहिमेत नागरिक व्यापारी तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला ऊर्जितावस्थेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न - पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : प्रतिनिधी

कोरोना संसर्गामुळे विविध प्रतिबंध लादण्यात आले होते. या प्रतिबंधामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे मोठे नुकसान झाले. महामंडळ हे सर्वसामान्यांचे परिवहनाचे साधन आहे या महामंडळाला ऊर्जितावस्थेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे राज्य उत्पादन शुल्क तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

पाटण एसटी बस आगाराला नवीन दहा बसेस मिळाले आहेत त्याचे लोकार्पण पालकमंत्री श्री देसाई यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रांताधिकारी सुनील गाडे, परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक शिवाजीराव जगताप, उपमहाव्यवस्थापक श्रीनिवास जोशी, विभाग नियंत्रक रोहन पलंगे, आगार व्यवस्थापक दयानंद पाटील आदी उपस्थित होते.

परिवहन महामंडळ उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासन विविध उपक्रम राबवत आहे असे सांगून पालकमंत्री श्री देसाई म्हणाले, राज्यातील प्रत्येक एसटी डेपोला नवीन बसेस व इलेक्ट्रॉनिक बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत तसेच डोंगरी भागासाठी लहान बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत .शासनाने नेहमीच परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य दिले आहे. कर्मचाऱ्यांनीही उपलब्ध होणाऱ्या बसेस चांगल्या पद्धतीने वापराव्यात व शिस्तबद्ध पद्धतीने काम करावे.

स्वच्छ व सुंदर डेपोसाठी राज्य शासनाने पारितोषिक जाहीर केले आहे हे पारितोषिक पटकविण्यासाठी पाटण आगाराने प्रयत्न करावा. बस स्थानक विस्तारणीकरणाच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. विविध विभागांच्या माध्यमातून विस्तारणीकरणाचा प्रश्न मार्गी लावावा असेही पालकमंत्री श्री देसाई यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविक महाव्यवस्थापक शिवाजीराव जगताप यांनी केले तर आभार आगार व्यवस्थापक दयानंद पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमास परिवहन महामंडळातील अधिकारी कर्मचारी नागरिक उपस्थित होते.

तहसीलदारांनी लागू केलेल्या १४४ कलम धुडकावून गोगवे येथे पोलीस बंदोबस्तात श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी

महाबळेश्वर : प्रतिनिधी

तहसीलदार यांनी लागु केलेल्या १४४ कलम धुडकावुन गोगवे येथे पोलिस बंदोबस्तात श्री विश्वकर्मा जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली आता कायदा हातात घेवुन जमावबंदी आदेश धुडकावुन ज्यांनी जंयती साजरी केली त्यांचेवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे आता पोलिसांच्या भूमिकेकडे तालुक्याचे लक्ष लागुन राहीले आहे.

गोगवे गावच्या सुतारवाडीत दरवर्षी मोठया उत्साहात श्री विश्वकर्मा जयंती मोठया उत्साहात साजरी केली जाते या जयंतीसाठी गावात सांस्कृतिक कला व क्रिडा मंडळाची स्थापना करण्यात आली आहे या मंडळात विविध राजकीय पक्षाचे लोक आहेत ही राजकीय मंडळी मध्ये जयंतीला राजकीय व्यक्तींना आमंत्रित करण्यावरून वाद झाला हा वाद विकोपाला गेला त्या मुळे गेल्या वर्षी गावात १४४ कलम जारी करून जमावबंदी आदेश लागु करण्यात आल्याने गेल्या वर्षी गावात जयंती अगदी साध्या पध्दतीने साजरी करण्यात आली यंदा देखिल जयंतीच्या आयोजना वरून गावात दोन गट पडले या दोन्ही गटात वाद सुरू झाले शेवटी हा वाद महाबळेश्वर पोलिस ठाण्या पर्यंत पोहचला पोलिस ठाण्यात तीन बैठका झाल्या परंतु वाद काही मिटला नाही शेवटी पोलिस विभागाच्या शिफारसी वरून तहसीलदार सुषमा चौधरी पाटील यांनी गोगवे गावात १४४ कलम लागु करण्यात आला त्या मुळे जयंती साजरी होणार की नाही असा प्रश्न उपस्थित राहीला होता मुंबई वरून गावात पोहचलेल्या शिंदे गटाने जमावबंदी आदेश डावलुन जयंतीची तयारी सुरू केली तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा गट मात्र गाफिल राहीला शिंदे गटाने जोरदार तयारी केली व नियोजना प्रमाणे सर्व कार्यक्रम पार पाडले या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख व इतर पदाधिकारी देखिल गावात पोहचले या सर्वांच्या उपस्थितीत स्टेजवरून जाहीर भाषणे झाली या वेळी धार्मिक कार्यक्रमात राजकारण करणारयांना खडया प्रमाणे बाहेर काढण्याचे आवाहन देखिल जिल्हा प्रमुख पुरूषोत्तम जाधव यांनी केले कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी त्या दिवशी गावात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

तहसीलदार यांनी १४४ कलम लागु करून जमावबंदी आदेश लागु केला असतानाही गावात जयंती साजरी झालीच कशी असा सवाल आता केला जात आहे पोलिस गावात असतानाही त्यांनी तहसीलदार यांच्या आदेशाचे पालन का केले नाही जमावाला रोखले का नाही जमाव पांगविला का नाही असा सवाल केला जात आहे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणारांवर गुन्हे दाखल करण्यात येईल अशी माहीती पोलिस निरीक्षक संदीप भागवत यांनी दिली परंतु जयंती होवुन तीन दिवस झाले तरी कोणावरही गुन्हे दाखल झाले नाही त्या मुळे गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिस कोणाच्या आदेशाची वाट पहात आहे असा सवाल गोगवे गावातील काही मंडळी करीत आहे.

गावात दोन गट आहेत एका गटाने मात्र १४४ कलम पाळुन जयंती साजरी केली नाही याच गटाने आत कायदा हातात घेवुन जयंती साजरी करणारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे या संदर्भात पोलिस निरीक्षक संदीप भागवत आता कोणती भूमिका घेणार या कडे राष्ट्रवादी कॉंग्रेस व उध्दव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागुन राहीले आहे जर यंदा गुन्हे दाखल करण्यास पोलिसांनी टाळाटाळ केली तर पुढील वर्षी या ठिकाणी दोन जयंतीचे कार्यक्रम होवून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही आणि याला दुटप्पी भूमिका बोटचेपी भूमिका घेणारे पोलिस प्रशासन जबाबदार असेल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी यांनी दिला आहे त्या मुळे पोलिस काय भूमिका घेतात या कडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागुन राहीले आहे.

अंगणवाडी कर्मचारी संघटनेची साताऱ्यात जोरदार निदर्शने

सातारा : प्रतिनिधी

अंगणवाडी कर्मचारी संघटना महाराष्ट्र सातारा जिल्हा कमिटीच्या वतीने सोमवारी सातारा जिल्हा परिषदेच्या परिसरावर विविध मागण्यांसाठी जोरदार निदर्शने करण्यात आली महागाई वाढली. पण मानधन मात्र वाढले नाही. या माध्यमात दुपटीने वाढ झालीच पाहिजे, अशा जोरदार घोषणा देत अंगणवाडी सेविकांनी सारा परिसर दणाणून सोडला. सुमारे ५०० हून अधिक अंगणवाडी महिला सेविका या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

सकाळी११:००वाजल्यापासून अंगणवाडी सेविकांनी जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारावर गर्दी करत आपल्या मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली. मानधन आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. अंगणवाडी सेविकांच्या मानधनामध्ये दुपटीने वाढ करण्यात यावी कारण महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे आणि गेल्या दोन वर्षापासून अंगणवाडी सेविकांना अल्प मानधनावर काम करावे लागत आहे, अशी तक्रार यावेळी सातारा जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात आली. गेल्या एक फेब्रुवारी पासून राज्य शासनाला सातत्याने आम्ही निवेदने देत आहोत मात्र त्या निवेदनांचा गांभीर्याने विचार होताना दिसत नाही याशिवाय अंगणवाडी सेविकांना दैनंदिन कामकाजासाठी जे मोबाईलवर ॲप देण्यात आलेले आहे ते इंग्रजीतून आहे ते ॲप मराठीतून देण्यात यावे तसेच निवृत्त अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना निवृत्तीवेतनाचे एक लाख रुपये आणि ७५ हजार रुपये हे देण्यात यावेत हे निवृत्तीवेतनाच्या रकमा सुद्धा गेल्या तीन ते चार महिन्यापासून प्रलंबित आहेत त्यामुळे या मागण्यांचा गांभीर्याने विचार झाला नाही तर अंगणवाडी सेविका संघटनेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात येईल राज्य शासनाने या संदर्भात वेळीच निर्णय घ्यावा अन्यथा २० फेब्रुवारीपासून बेमुदत संप सुरू केला जाईल असा इशारा देण्यात आला आहे अंगणवाडी सेविकांच्या शिष्टमंडळांनी सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांना निवेदन घेऊन त्या संदर्भात चर्चा केली.

तुर्की-सीरियात हाहा:कार! भूकंपातील बळींचा आकडा ६२०० वर

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

तुर्की आणि सीरियामध्ये सोमवारी झालेल्या विनाशकारी भूकंपातील बळींची संख्या आता ६२०० वर पोहोचली आहे. या भीषण घटनेमुळे तुर्कस्तानच्या राष्ट्राध्यक्षांनी भूकंपग्रस्त भागात तीन महिन्यांसाठी आणीबाणी जाहीर केली आहे. डब्ल्यूएचओनेही उर्वरित देशांना सीरियाला जास्तीत जास्त मदत करण्याचे आवाहन केले आहे.

तुर्की आणि सीरियामध्ये सोमवारी सकाळी ७.८, ७.६ आणि ६.० तीव्रतेचे सलग तीन विनाशकारी भूकंप झाले. यामध्ये आतापर्यंत ६२०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार २३ कोटी लोकांना या दुर्घटनेचा फटका बसू शकतो.

तुर्किमध्ये मदत बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. यादरम्यान अनेक हृदय पिळवटून टाकणारी दृश्येही समोर आली आहेत. उत्तर सीरियात एका घराच्या ढिगाऱ्यातून नवजात अर्भकाला जिवंत बाहेर काढण्यात आले. परंतु, त्याच्या आईचा मात्र मृत्यू झालाय. जिंदयारिस शहराला ७.८ रिश्टर स्केलच्या भूकंपाने हादरवल्यानंतर ही मुलगी तिच्या कुटुंबातील एकमेव वाचलेली आहे.

भारताने मंगळवारी श्वान पथक, आर्मी फील्ड हॉस्पिटल आणि चार लष्करी विमानांमध्ये मदत सामग्रीसह शोध आणि बचाव पथक तुर्किये येथे पाठवले. ३० खाटांची वैद्यकीय सुविधा उभारण्यासाठी भारताने तुर्कि येथे भारतीय लष्कराचे फील्ड हॉस्पिटल पाठवले. आयएएफच्या पहिल्या विमानात ४५ सदस्यीय वैद्यकीय पथक रवाना करण्यात आले. ज्यामध्ये क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट आणि सर्जन यांचा सहभाग होता. यामध्ये एक्स-रे मशिन, व्हेंटिलेटर, ओटी आदी उपकरणेही पाठवण्यात आली.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी दिलेल्या माहितीनुसार, हवाई दलाने एकूण चार विमाने तुर्की येथे पाठवली आहेत. चौथे विमान उर्वरित फील्ड हॉस्पिटलसह तुर्कीकडे रवाना झाले. यामध्ये भारतीय लष्कराच्या वैद्यकीय पथकातील ५४ सदस्यांचा तसेच सुविधा उभारण्यासाठी वैद्यकीय आणि इतर उपकरणांचा समावेश होता.

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ट्वीट केले आहे की, ''६ टन आपत्कालीन मदत घेऊन खअऋ विमान सीरियाला रवाना झाले आहे. यात जीव वाचवणारी औषधे आणि आपत्कालीन वैद्यकीय पुरवठा यांचा समावेश आहे. या दुर्घटनेचा सर्वाधिक फटका बसलेल्या लोकांना मदत करण्यात भारत तत्पर आहे.

तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगन यांनी मंगळवारी भूकंपामुळे प्रभावित झालेल्या १० आग्नेय प्रांतांमध्ये तीन महिन्यांसाठी आणीबाणीची घोषणा केली. एर्दोगन म्हणाले की मानवतावादी मदत कर्मचारी आणि आर्थिक मदतीसह प्रभावित भागात अनेक आपत्कालीन उपाययोजना केल्या जातील. आम्ही या निर्णयाशी संबंधित प्रक्रिया लवकर पूर्ण करू, ज्यामध्ये आमचे १० प्रांत समाविष्ट असतील. भूकंप झालेल्या प्रदेशात ५०,००० हून अधिक मदत कर्मचारी पाठवले आहेत.

अदानींसाठी मंगळवार ठरला 'मंगलदिन'; सर्वाधिक श्रीमंतांच्या यादीत पुन्हा झेप

नवी दिल्ली : प्रतिनिधी

अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांच्यासाठी आजचा मंगळवारचा दिवस शुभ ठरला आहे. गेल्या १० दिवसांपासून हिंडेनबर्गच्या अहवालामुळे अदानी समुहाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली होती. कंपनीचे मार्केट कॅप १०० अब्ज डॉलरपर्यंत घसरले होते. आज अदानी समूहाच्या शेअर दरात तेजी दिसून आली. त्याच्या परिणामी अदानी यांनी सर्वाधिक श्रीमंताच्या यादीत मोठी झेप घेतली.

मंगळवारी, शेअर बाजारात अदानीच्या बहुतांश शेअर्समध्ये जबरदस्त वाढ दिसून आली. अदानी एंटरप्रायझेसचे शेअर १४.९४% वाढून १८०७.२५ रुपये झाले. अदानी कंपनीच्या शेअर दरात वाढ झाल्यानंतर गौतम अदानी यांची संपत्ती झपाट्याने वाढू लागली. त्यानंतर गौतम अदानी यांनी फोर्ब्सच्या रिअल-टाइम अब्जाधीशांच्या क्रमवारीत २२ व्या क्रमांकावरून १७ व्या क्रमांकावर झेप घेतली.

अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर दरात झालेल्या वाढीमुळे, अदानीची एकूण संपत्ती १.१ अब्ज डॉलरने वाढली आणि त्यांचा छर्शी थेऔंह हा ६२.२ अब्ज डॉलर इतकी झाली.

हिंडेनबर्गचा अहवाल २४ जानेवारी २०२२ रोजी प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर अदानी यांना मोठा धक्का बसला. एकेकाळी १२७ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह जगातील तिसरी श्रीमंत असलेले गौतम अदानी यांची घसरण होऊन २२ व्या क्रमांकावर पोहचले होते. हिंडेनबर्ग अहवालामुळे कंपनीचे बाजार भांडवल ५० टक्क्यांहून अधिक घसरले. अदानीच्या शेअर्स दरात सोमवारी किंचित वाढ आणि मंगळवारी मोठी वाढ

झाल्याने अदानीच्या संपत्तीत मागील २४ तासांत १.८ अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे. गौतम अदानी फोर्ब्सच्या रिअल टाईम अब्जाधीशांच्या यादीत त्यांच्या संपत्तीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानंतर २२ व्या क्रमांकावरून १७ व्या स्थानावर पोहचले.

अदानी यांच्यावर गुंतवणूकदारांचा विश्वास?

अदानी समूहाने सोमवारी, तारण ठेवलेले शेअर्स सोडवण्यासाठी १.११ अब्ज डॉलरच्या कर्जाची परतफेड मुदतीआधीच केली. अदानी समूहाने ही घोषणा केल्यानंतर गुंतवणूकदारांनी अदानी समूहावर विश्वास टाकला असल्याचे चित्र आहे. बाजारातील व्यवहार सुरू झाल्यानंतर अदानी एंटरप्रायझेसचे शेअर्स २० टक्क्यांनी वधारले. तर, अदानी पोर्ट्स कंपनीचेय शेअर दर ९.६३ टक्क्यांनी वधारले. अदानी ग्रीनच्या शेअर्समध्ये ३.८४ टक्के, अदानी विल्मरच्या शेअर दरात ४.९९ टक्क्यांची तेजी दिसून आली. अदानी पॉवर वगळता इतर कंपन्यांच्या शेअर दरात चांगली वाढ झाली. अदानी पोर्टस ॲण्ड स्पेशल इकॉनॉमिक झोन, अदानी ग्रीन एनर्जी आणि अदानी ट्रान्समिशन या कंपन्यांचे तारण ठेवलेले शेअर्स सोडवून घेतले आहेत.

डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येचा खटला दोन-तीन महिन्यांत संपवणार

सीबीआयची हायकोर्टात ग्वाही

मुंबई : प्रतिनिधी

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणातील खटल्याची सुनावणी येत्या दोन ते तीन महिन्यांत पूर्ण होईल, अशी ग्वाही सीबीआयनं मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयला दिली आहे.

दाभोलकरांच्या हत्येप्रकरणी वीरेंद्र तावडेला तपासयंत्रणेनं साल २०१६ मध्ये अटक केली होती. वीरेंद्र तावडेनं सध्या मुंबई उच्च न्यायालयात (र्चीलरळ कळसह र्डीऑं) जामीनासाठी अर्ज केला आहे. त्यावर मंगळवारी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती प्रकाश नाईक यांच्यासमोर सुनावणी झाली. पुणे सत्र न्यायालयातील विशेष कोर्टात सुरू असलेल्य खटल्यात साक्षीदारांचे जबाब नोंदवणं सुरू असून आतापर्यंत १५ साक्षीदारांचे जबाब नोंदवून झाले आहेत अशी माहिती सीबीआय्चयावतीनं अँड. संदेश पाटील यांनी न्यायालयाला दिली. यापैकी किती साक्षीदारांनी जबाब फिरवला आहे?, अशी विचारणा न्यायालयाने केली. तेव्हा, कोणीही आपली साक्ष फिरवली नसून आता फक्त ७ ते ८ साक्षीदारांची साक्ष नोंदवणं बाकी असल्याचंही पाटील यंनी कोर्टाला सांगितलं. त्यानंतर हा खटला पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल? अशी विचारणा न्यायालयानं केली असता, सर्व काही जलदरित्या खटला सुरू राहिल्यास पुढील दोन ते तीन महिन्यांत उर्वरित युक्तिवादासह सुनावणी पूर्ण होईल, अशी माहितीही पाटील यांनी हायकोर्टाला दिली. पुण्यात २० ऑगस्ट २०१३ रोजी अंनिसचे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची मॉर्निंग वॉकच्यावेळी ओंकारेश्वर मंदीराजवळ गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

सीबीआयची बाजू ऐकल्यानंतर आणखीन काही महिने थांबण्याची सूचना खंडपीठानं तावडेच्या वकिलाला हायकोर्टानं केली. मात्र, आपली जामीनाची याचिका गुणवत्तेच्या आधारे असल्यानं त्यांनी थांबण्यास नकार दिला. वीरेंद्र तावडे मागील सात वर्षांपासून कारागृहात आहे. या खटल्यात तावडेची कथित भूमिका कटकारस्थान रचणं ही असून, त्याच्याविरुद्ध केवळ एकच साक्षीदार आहे. ज्याने दाभोलकरांच्या हत्येचा कट रचल्याचं तावडेनंचं त्याला सांगितल्याचं म्हटलेलं आहे.

पशू-पक्षांना आधीच लागते संकटाची चाहूल?

- **भूकंपाआधी तुर्कीमध्ये पक्षांचा विचित्र आवाज, घिरट्या घालतानाचा व्हिडीओ व्हायरल**

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पशू-पक्षांना संकटाची चाहूल लागते असं आपण अनेक वेळा वडीलधाऱ्या व्यक्तींकडून ऐकलं असेल. सध्या तुर्की आणि सीरियामध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीने जगाचं लक्ष वेधलं आहे. तुर्की आणि सीरियात भूकंपामुळे सुमारे ६२०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, या भूकंपाआधीचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये पक्षी आकाशात घिरट्या घालत विचित्र आवाज काढताना ऐकायला आणि पाहायला मिळत आहे. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

एखादं संकट येण्यापूर्वी पक्षी किंवा प्राण्यांना त्याची चाहूल लागते, असं म्हटलं जातं. अनेक वेळी तुम्ही ऐकलं असेल की, कुत्र्यांनी काही संकटाची चाहूल लागली की ते रडतात. काही वाईट घडणार आहे याचा अंदाज आल्याने काही पशू आणि पक्षी विचित्र आवाज किंवा हालचाल करून आपलं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात, असं काही लोक मानतात. त्यामुळे तुर्कीमधील हा व्हिडीओ पाहिल्यानंतरही लोक आता हेच म्हणत आहेत. सोशल मीडियावर चर्चा सुरु झाली आहे की, भूकंपाची चाहूल लागल्यामुळे तुर्कीमध्ये पक्षी विचित्र आवाज काढत आकाशात घिरट्या घालत होते.

भूकंपाआधी तुर्कीमध्ये पक्षांचा विचित्र आवाज

व्हायरल व्हिडीओमध्ये तुम्हाला दिसेल की, काही पक्षी आवाज घिरट्या घालत विचित्र प्रकारचा आवाज काढत आहे. हा आवाज अतिशय कर्कश आणि मोठा आहे. या परिसरातील लोकांनी पक्षांचे हे कधी न पाहिलेलं वागणं आणि हालचाली विचित्र असल्याचे जाणवले आणि काहींनी ही घटना कॅमेऱ्यामध्ये चित्रित केली. त्यानंतर सोमवारी तुर्की आणि सीरियामध्ये भूकंप झाला. त्यामुळे आता पक्षांच्या या विचित्र वागण्याचा संदर्भ भूकंपाच्या घटनेसोबत जोडला जात आहे.

पक्षी तज्ज्ञांचं मत काय?

प्राण्यांना किंवा पक्षांना संकटाची चाहूल लागते की नाही याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत बाब समोर आलेली नाही.

कोरेगावात विकास आराखडा रद्द करण्यासाठी रास्ता रोको

आराखडा रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन : संघर्ष समितीचा इशारा

कोरेगाव : प्रतिनिधी

नगररचना विभागाने तयार केलेला प्रारूप विकास् आराखडा रद्द करावा या मागणीसाठी कोरेगाव बचाव संघर्ष समितीच्या वतीने आज जुना मोटार स्टॅण्ड परिसरातील हिंदभवन चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. तसेच विकास आराखडा रद्द न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

दरम्यान, बाधित ग्रामस्थांनी विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार, नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना दिले. शासनाच्या नगर रचना विभागाने कोरेगाव शहराचे वाढते नागरिकरण आणी शहरीकरण पाहून पुढील पंचवीस वर्षाची गरज पाहून प्रारूप विकास आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रिंग रोड, अंतर्गत रस्ते, शाळा, बगीचा, स्म्शानभूमी आदीचा समवेश करण्यात आला आहे. तो आराखडा दि.२३ जानेवारी २३ रोजी नगरपंचायतीच्या विशेष सभेत जाहीर करण्यात आला. तोच आराखडा शासनाच्या राजपत्रात दि ३० जानेवारी २३ रोजी प्रसिद्ध झाला. आराखडा जाहीर झाल्यापासून बाधित शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला आहे. तो आराखडा रद्दच करावा, अशी मागणी बाधितानी आमदार महेश शिंदे, आमदार शशिकांत शिंदे यांच्यासह

प्रांताधिकारी, तहसीलदार यांच्याकडे केली आहे. शासनाने आराखड्यावर हरकती घेण्यासाठी तीस दिवसाचा वेळ दिला आहे. त्यानुसार बाधित ग्रामस्थ आणी शेतकऱ्यांनी कागदपत्रासह हरकती दाखल करावयात् असे आवाहन नगरपंचायतीने केले आहे. मात्र बाधित ग्रामस्थांनी विकास आराखडाच अन्याय कारक असल्याने रद्द करावा, यासाठी हरकती देण्याबरोबर आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. त्याचा एक भाग म्हणून आज सकाळी जुनामोटर स्टॅण्डवर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. सर्व बाधित ग्रामस्थ आणी शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन हिंदभुवन समोर रस्त्यावर ठिय्या मांडला. रस्ता रोको दरम्यान सातारा कडे जाणाऱ्या आणी पुसेगाव कडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. अन्याय कारक विकास आराखडा रद्द झाला पाहीजे, शेतकरी एकजुटीचा विजय असो, अशा घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोरेगाव तालूकाध्यक्ष प्रतिभाताई बर्गे, माजी नगरसेवक किशोर बर्गे, सौ.संगीता बर्गे, शिवसेनेनचे माजी उपजिल्हा प्रमुख दिनेश बर्गे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विकास आराखडा सत्ताधारी लोकांच्या फायद्याचा आणी सर्वसामान्य जनतेवर अन्याय कारक असल्याचे सांगत, तो रद्द झाला पाहिजे अशी मागणी केली.

रस्तारोको नंतर सर्व आंदोलकांनी मोर्च्याने जाऊन तहसीलदार्, मुख्याधिकारी यांना मागण्याचे निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने लादलेला विकास आराखडा शेतकऱ्यांना भूमिहीन करणारा आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. या शेतीवर आरक्षण टाकल्यास शेतकरी अडचणीत येणार आहे. शेतकऱ्यांना त्या जमिनीवर कोणी कर्ज देणार नाही. कोरेगावकरांना १०० आणी ५० फुट रस्त्याची गरज नाही आणी पुढे वीस वर्षात लागणार नाही तरीदेखील एवढे रस्ते करून आम्हाला भूमिहीन करण्याचा शासनाचा डाव आहे. यापूर्वी धोम डावा कालवा, रेल्वे, पुनर्वसन, कॉलेज, मफको साठी शेकडो एकर जमीन घेतली आहे. त्यानंतर उरलेल्या जमिनीवर १९८९ साली आरक्षण टाकली आहेत. त्यानंतर आता पुन्हा राहिल्या साहिल्या जमिनी काढून घेऊन शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचा शासनाचा पर्यन्त आहे. तो आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे.

रास्ता रोकोला माजी जिल्हा परिषद सदस्य किरण बर्गे, माजी सरपंच प्रभाकर बर्गे, मनोहर बर्गे, युवराज बर्गे, हणमंत बर्गे, सचिन बर्गे, हेमंत बर्गे, अमर बर्गे, अक्षय बर्गे, संजय बर्गे, अजित बर्गे, डॉ. गणेश होळ, बिपीन बर्गे, प्रशांत गायकवाड, राजेंद्र धनावडे, विवेक चव्हाण यांच्यासह् बाधित शेतकरी आणी ग्रामस्थ उपस्थित होते.

आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

कोणतीही पूर्व परवानगी न घेता सातारा-पंढरपूर रस्त्यावर हिंद भवन चौकात बेकायदा जमाव जमवून रास्ता रोको करून दोन्ही बाजूकडील ये- जा करणारी वाहने निरुद्ध केल्याप्रकरणी प्रतिभाताई शिवाजीराव बर्गेसह, तीस ते चाळीस जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सोमवार दि. ६ रोजी साडे अकरा वजण्याच्या सुमारास प्रतिभाताई बर्गे, दिनेश लक्ष्मण बर्गे, अमरसिंह शहाजीराव बर्गे,सचिन बाळासाहेब बर्गे, प्रभाकर विश्वासराव बर्गे,प्रीतम आनंदराव बर्गे,प्रशांत बबनराव गायकवाड, अक्षय संजय बर्गे,संजय लक्ष्मण पिसाळ,मनोहर वसंतराव बर्गे,किरण संभाजीराव बर्गे सर्वजण रा.कोरेगाव यांचेसह ३० ते ४० समर्थकांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता बेकायदा जमाव जमवून सातारा-पंढरपूर रस्त्यावर हिंद भुवन चौकात रास्ता रोको आंदोलन करून रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील वाहतूक निरुद्ध केल्याप्रकरणी त्यांचेवर गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी समाधान श्रीरंग गाढवे वय ३४ पोलीस कॉन्स्टेबल, कोरेगाव पोलीस ठाणे यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम करत आहेत.